दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.१७ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 17 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 199 | Pages 4 | Rate 4 Rs

### मराठी शाळा दाखवून लाटला ५ कोटींचा निधी ?

**मुंबई**–सेनगाव तालुक्यातील कोळसा येथील विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळाच्या नामांकित इंग्रजी शाळेच्या चौकशीचे आदेश देण्यात आल्याची घोषणा इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सोमवारी विधानसभेत केली आहे. त्यानुसार पुढील पंधरा दिवसात या शाळेची चौकशी होऊन दोषीवर कारवाई होणार असल्याची माहिती आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी दिली आहे.सेनगाव तालुक्यातील कोळसा येथे विद्याशक्ती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मराठी शाळा असतांनाही कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून इंग्रजी शाळा दाखविण्यात आली. त्यानुसार इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या राजे यशवंतराव होळकर नामांकित शाळा योजनेचा लाभ घेण्यात आला. या शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे दाखवून या शाळेने सुमारे ५ कोटी रुपये उचलण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या शिवाय मराठी शाळेची मान्यता एका ठिकाणी असतांना दुसरीकडे शाळा सुरु केल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. या प्रकरणी शाळेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प-मुख्यमंत्री फडणवीस

**पाणी फाउंडेशन ने महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. या फाउंडेशनने राज्य शासनाच्या समवेत राज्याला बसणाऱ्या दुष्काळाची तीव्रता कमी करण्यात मदत केली.यापुढेही पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने पाणीदार महाराष्ट्राचा संकल्प करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मंत्रालयात आयोजित बैठकीत पाणी फाउंडेशनच्या जलसंधारण कामाच्याबाबत सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.बैठकीस कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंग, पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमिर खान, किरण राव, पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, तसेच अमित चंद्रा, विलास शिंदे आदी उपस्थित होते.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, कृषी विभागाचे अधिकारी सहभागी झाले होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हवामान विषयक संशोधन करणाऱ्या विविध संस्थांनी यावर्षी एल निनोचा प्रभाव जाणवणार असल्याचे मत केले आहे त्यामुळे राज्यात ८० टक्के पाऊस होईल, असे गृहीत धरून जलसंधारणाच्या कामांचे नियोजन करावे. पाणी फाउंडेशनच्या मागील कामाचा अनुभव बघता त्यांच्या माध्यमातून यावर्षीही शेतकरी, ग्रामस्थ जलसाक्षर होतील.पाण्याचे महत्व ओळखून फाउंडेशन काम करत आहे. या कामासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी फाउंडेशनला मदत करावी. त्यासाठी पूरक यंत्रणा सज्ज ठेवावी. फाउंडेशन राज्यात करीत असलेल्या जलसंधारणाच्या कामांमध्ये मृद व जलसंधारण विभागाचाही समावेश करावा. पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून होत असलेल्या कामाचा दर्जा चांगला राखण्यासाठी, त्यांच्या मागणीनुसार नियंत्रण आणि पडताळणी यंत्रणेची आवश्यकता आहे. यासाठी कृषी सहाय्यक तसेच ग्रामविकास विभागाच्या उमेद अभियानामधील कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली व्यवस्था उभारण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.बैठकीत पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सादरीकरण केले. यावेळी संस्थापक आमिर खान, किरण राव, अमित चंद्रा यांनीही जलसंधारणाची कामे प्रभावी होण्यासाठी मते व्यक्त केली. फाउंडेशनने राज्यामध्ये स्वयंसेवक तत्त्वावर १३ हजार १२१ शासकीय अधिकाऱ्याचे मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षणासाठी नोंदणी केली आहे. तसेच फार्मर कप निवासी प्रशिक्षणासाठी १६ हजार २६० शेतकरी सहभागी झाले आहेत. यामध्ये ५७.५६ टक्के महिला शेतकरी आहेत तसेच ११ हजार ९५ निमंत्रकांनी नोंदणी केली आहे.

## वैयक्तिक वादाला धार्मिक रंग देणाऱ्या तिघांना बेड्या; नंदुरबार शहर पोलिसांची धडक कारवाई

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाला जाणीवपूर्वक धार्मिक स्वरूप देऊन सामाजिक शांतता धोक्यात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन इसमांना नंदुरबार शहर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अफवा पसरवून शहरात तेढ निर्माण करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कठोर पाऊल उचलल्याने अशा प्रवृत्तींचे धाबे दणाणले आहेत.दिनांक १३ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिरासमोर दोन गटात वाहनाचा कट लागल्याच्या कारणावरून वाद झाला होता. त्यावरून नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३६३/२०२६ व ३६४/२०२६ अन्वये परस्पराविरोधात क्रॉस गुन्हे दाखल करण्यात आले होते.

गु.र.नं. ३६३/२०२६ मधील मूळ फिर्यादीने आपल्या तक्रारीत कोणताही धार्मिक वाद झाल्याचा उल्लेख केला नव्हता. मात्र, याच गुन्ह्यातील साक्षीदार समीर खान शेर खान पठाण याने या घटनेला धार्मिक वादाचे स्वरूप देऊन शहरात अफवा पसरवल्या. यामुळे काही काळ शहरात गैरसमज पसरून सामाजिक शांतता विस्कळीत होण्याचे चित्र निर्माण झाले होते.शहरातील शांतता राखण्यासाठी पोलिसांनी तातडीने तपास चक्र फिरवले. पोलीस उपनिरीक्षक भुनेश मराठे यांच्या फिर्यादीवरून, खोटा बनाव रचून अफवा पसरवणाऱ्या खालील संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे:

१. समीरखान शेर खान पठाण (वय २६, रा. पटेलवाडी, नंदुरबार)

२. शाहरुख खान रहीम खान पठाण ऊर्फ मास (वय २९, रा. जुना बैल बाजार, नंदुरबार)

३. शेख शोएब शेख फारूक ऊर्फ माज (वय २६, रा. काली मशिदीजवळ, नंदुरबार)

या संशयितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १९२, ३५३(२), ३(५) प्रमाणे गुन्हा (गु.र.नं. ३६६/२०२६) दाखल करण्यात आला आहे.




### प्रशासनाचा इशारा

**वैयक्तिक वादाला धार्मिक रंग देणाऱ्यांवर या कारवाईमुळे जरब बसेल आणि शहराची कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, असा विश्वास पोलीस प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि सामाजिक सलोखा कायम राखावा, असे आवाहनही नंदुरबार शहर पोलिसांनी केले आहे.**

## केज येथे सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना.श्री.संजय शिरसाट, मराठवाडा सचिव श्री. अशोक पटवर्धन, शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.सचिन मुळूक तसेच श्री.बाळासाहेब सानप हे केज येथे सदिच्छा भेटी साठी रविवार दि.१५ मार्च रोजी आले असता त्यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेनेच्या उपनेत्या तथा माजी आमदार सौ.संगीताताई ठोंबरे,प्रा.विजयप्रकाश ठोंबरे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख पृथ्वीराज पाटील, शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे,तालुका सचिव विकास काशीद,महिला आघाडी तालुकाप्रमुख जयाताई राऊत,शहर प्रमुख वैशालीताई सांगळे,उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे,ज्येष्ठ नेते मालोजी नाना गलांडे पाटील,ज्येष्ठ नेते प्रकाश गुंड,ज्येष्ठ नेते डॉ.संतोष बुडूक,अभिजीत घाटूळ, संदीप नाईकवाडे,अशोक जोगदंड,बळीभाऊ चाटे, बलवंत सिंग गोके यांच्या सह शिवसेनेचे सर्व पदाधिकारी,शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी केज तालुक्यातील विविध विकास कामांबाबत ना.श्री.संजय शिरसाट यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली.तसेच तालुक्यातील प्रलंबित विकास कामांसंदर्भात निवेदन देण्यात आले आणि आजपर्यंत केलेल्या कार्याचा कार्य अहवालही सादर करण्यात आला.

## अमृत पेठ २०२६ उद्योजक मेळाव्याचे उत्साहात उद्घाटन

### ग्राहकांना स्थानिक उत्पादनांच्या खरेदीचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच ग्राहकांना थेट उत्पादकांकडून दर्जेदार वस्तू खरेदीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे आयोजित अमृत पेठ २०२६ या भव्य उद्योजक मेळाव्याचे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले.देवळाई चौक, बीड बायपास परिसरातील शिवम मंगल कार्यालयात सुरू झालेला हा मेळावा १५ मार्च पर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत नागरिकांसाठी खुला राहणार आहे. स्वदेशी बाजारपेठ या संकल्पनेअंतर्गत आयोजित या मेळाव्यात स्थानिक उद्योजक, महिला बचत गट तसेच नवउद्योजकांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांचे आकर्षक स्टॉल उभारण्यात आले आहेत.मेळाव्यात घरगुती उत्पादने, हस्तकला वस्तू, विविध खाद्यपदार्थ, कपडे तसेच दैनंदिन वापराच्या अनेक वस्तू उपलब्ध असून नागरिकांना या वस्तू थेट उत्पादकांकडून खरेदी करण्याची संधी मिळत आहे. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिवाकर कुलकर्णी व सविताताई कुलकर्णी, नगरसेविका सौ. माधुरी अदवंत - देशमुख, नगरसेविका सविता कुलकर्णी, अनिल मुळे, आदित्य धाराशिवकर तसेच अमृत संस्थेचे राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, अमृतचे विभागीय उपव्यवस्थापक ओंकार शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.या मेळाव्यास छत्रपती संभाजीनगरकरांनी मोठ्या संख्येने भेट देऊन स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन द्यावे आणि वोकल फॉर लोकल या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. डॉ. दिवाकर कुलकर्णी यांनी सांगितले की 'अमृत पेठ २०२६' हा उपक्रम स्थानिक उद्योजकांसाठी अत्यंत प्रेरणादायी आणि सकारात्मक पाऊल आहे. अशा मेळाव्यांमुळे आपल्या परिसरातील लघुउद्योजक, महिला बचत गट आणि नवउद्योजकांना स्वतःची उत्पादने थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची उत्तम संधी मिळते. 'वोकल फॉर लोकल' या संकल्पनेला प्रत्यक्ष बळ देणारा हा उपक्रम असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देऊन स्वदेशी व स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे. यामुळे स्थानिक उद्योगांना चालना मिळून रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण होतील. आयोजनासाठी अमृतचे जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे, जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे, अमृत सखी मंजू कुलकर्णी, ऋचा शर्मा, अमृत मित्र रामेश्वर साळुंके, अजय कुलकर्णी, चिंतेश जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे यांनी केले.


## खाजगी बसचा केज ते मांजरसुंबा रोडवरील सारणीच्या पुलावर अपघात,२२ प्रवासी जखमी

### अपघाता नंतर खाजगी बस जळून खाक बसचा नंबर सुध्दा दिसेना;१९ जखमी प्रवाशांवर अंबाजोगाईत उपचार सुरु

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज- मांजरसुंबा रोडवरील सारणीच्या पुलावर वळण घेताना एक खाजगी बस पलटी होताच खाजगी बसने पेट घेतला.या बसमधील २२ प्रवाशी जखमी झाले.या अपघाताची माहिती रात्रीची गस्त घालणा-या केजपोलीसांना मिळताच त्यांनी अपघातस्थळी धाव घेऊन जखमीना धीर देत रुग्ण वाहिकेच्या मदतीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात जखमी प्रवाशांना पाठवले.यातील ३ तीन रुग्णांना उपचार करुन त्यांना सुट्टी दिली तर १९ रुग्णांना पुढील उपचारा साठी अंबाजोगाई येथे पाठवले आहे.सुदैवाने या अपघातात व आगीत जीवित हानी झाली नाही.बीड जिल्ह्यातील केज-मांजरसुंबा रोड वरील सारणीच्या पुला वरील वळणावर दि.१६ मार्च,सोमवार रोजी मध्यरात्री २:३० वाजण्याच्या सुमारास जळगावहून लातूरकडे जात असलेली भरधाव वेगातील खाजगी बस चालकाचा ताबासुटल्याने रस्त्याच्या कडेला पलटी झाली.बसमधील जखमी प्रवासी बाहेर पडत असताना बसने पेट घेतला.मात्र सुदैवाने या आगीत जीवित हानी झाली नाही.या

अपघाताची माहिती केजचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना मिळताच त्यांनी रात्र गस्तीवर असलेल्या पोलिस पथकाला. माहिती देताच पोलिस उपनिरीक्षक अमिरोद्दीन इमानदार व चालक सहाय्यक पोलिस उप निरीक्षक शंभुदेव दराडे हे तत्काळ अपघातस्थळी हजर होऊन त्यांनी रुग्ण वाहिकेशी संपर्क साधला.पोलिस,रुग्ण वाहिका चालक सुमित तेलंग,त्याचे इतरसहकारी आणि गावकऱ्यांच्या मदतीने प्रवाशांना अपघातग्रस्त वाहनातून बाहेर काढण्यात आले. अपघातात २२ प्रवाशी जखमी झाले होते. यातील ३ तीन जखमी रुग्णावर उपचार करुन सुट्टी दिली तर १९ रुग्णांना पुढील उपचारा साठी अंबाजोगाई येथील सरकारी दवाखान्यात पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.अपघात ग्रस्ताने ट्रॅव्हल्स बसने घेतला पेट बस जुळून खाक -




अपघातात पलटी झालेल्या ट्रॅव्हल्स कंपनीच्या लक्झरी बस मधून जखमी प्रवाशांना बाहेर काढले जात असतानाच घर्षणामुळे निर्माण झालेल्या उष्णतेने बसने पेट घेतला आणि गाडीच्या इंधनाची टाकी फूटल्याने आग भडकून बस पूर्णतः जळून खाक झाली.

**दी बर्निंग बसचा थरार !**

बसला प्रचंड मोठी आग लागल्याने आग आटोक्यात आणण्याची संधी मिळाली नाही.या आगीमुळे रोडवर मध्यरात्री दी बर्निंग बसचा थरार पहायला मिळाला.

**प्रवाशांचे सामान जळून खाक**

बसने पेट घेतल्याने प्रवाशांचे सामान जळून खाक झाले.

पोलिस आणि रुग्णवाहिका चालक यांची तत्परता - अपघाताची माहिती मिळताच पोलिस आणि रुग्णवाहिकाचा चालक व सोबतचे कर्मचारी यांनी अपघातस्थळी तात्काळ हजर होत जखमींना बाहेर काढले.

जखमीवर उपचार सुरू - अपघातील २२ जखमी प्रवाशांवर केज येथील उपजिल्हा रुग्णालयात कर्तव्यावरील वैद्यकीय अधिकारी व त्यांच्या स्टाफने प्रथमोपचार करून संदर्भीय उपचारा साठी १९ रुग्णांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात पाठवण्यात आले असुन त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

# संपादकीय

## एसटीला लागलेले 'ग्रहण'

राज्यातील वाढत्या अवैध प्रवासी वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एक मार्चपासून राज्यभर कठोर कारवाई करण्याचा आदेश संबंधित यंत्रणांना दिला आहे. या निर्णयामुळे अवैध प्रवासी वाहतुकीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. एक मार्च पासूनचा गेल्या सुमारे पंधरवड्याचा आढावा घेतला तर काय दिसते? तर, या बाबतीत वाहतूक पोलिस, आरटीओ व एसटी या तिन्ही विभागांनी कुठलेही फारसे नियोजन न करता किंवा कुठलेही परिपत्रक न काढता देखील निव्वळ एका बैठकीमुळे व शासनाच्या प्रसिद्धीपत्रकामुळे मोठी फलनिष्पत्ती दिसून आली आहे. या पंधरवड्यात एसटीचे उत्पन्न वाढल्याचे दिसते आहे. याचाच अर्थ अवैध वाहतूक हेच एसटीला लागलेले ग्रहण आहे. या समस्येचा संबंधित यंत्रणांनी नीट प्रतिकार केला तर एसटीला लागलेले हे ग्रहण सुटून चित्र बदलल्याशिवाय राहणार नाही.अवैध प्रवासी वाहतूक म्हणजे सरकारने ठरवलेल्या कायद्यांनुसार आवश्यक परवाना (परमिट), नोंदणी किंवा अधिकृत परवानगी न घेता प्रवाशांची वाहतूक करणे होय. आपल्या देशात ही बाब प्रामुख्याने मोटर वाहन अधिनियम , १९८८ अंतर्गत येते. या कायद्यानुसार कोणत्याही वाहनाने पैसे घेऊन प्रवाशांची वाहतूक करायची असल्यास त्यासाठी विशिष्ट परवाना, मार्ग परवाना (रूट परमिट); तसेच इतर आवश्यक कागदपत्रे, परवानग्या असणे बंधनकारक असते. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या नियमांकडे दुर्लक्ष करून प्रवासी वाहतूक सुरू असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या अवैध प्रवासी वाहतुकीची अनेक उदाहरणे राज्यभर आढळतात. खासगी कार, जीप किंवा दुचाकीवर पैसे घेऊन प्रवाशांची ने-आण करणे, परवानगी नसताना शेअरिंग रिक्षा किंवा कार चालवणे, परवाना नसताना ऑनलाइन प किंवा बाईक टॅक्सीच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक करणे, परमिटने मंजूर केलेल्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहनात बसवणे किंवा ठरलेल्या मार्गाबाहेर प्रवासी वाहतूक करणे ही त्याची प्रमुख उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या वाहतुकीमुळे वाहतूक व्यवस्थेतील शिस्त ढासळते आणि नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणावर होते.मोटर वाहन अधिनियमातील तरतुदीनुसार अवैध प्रवासी वाहतूक हा गंभीर गुन्हा मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित वाहनावर दंड आकारणे, वाहन जप्त करणे, चालकाचा परवाना निलंबित किंवा रद्द करणे अशा कारवाया केल्या जाऊ शकतात. मोटर वाहन अधिनियमातील कलम ६६ आणि १९२अ अंतर्गत अशा गुन्ह्यांची नोंद केली जाते.प्रश्न असा निर्माण होतो, की शासनाला या अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्याची गरज का भासली, याचे उत्तर राज्यातील सध्याच्या परिस्थितीत दडलेले आहे. गेल्या काही वर्षांत अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे.ग्रामीण भागात साधारणपणे ४० ते ६० किलोमीटर अंतरावर जीप, टेम्पो किंवा सहा आसनी रिक्षांच्या माध्यमातून प्रवाशांची अवैध रीतीने टप्पे वाहतूक केली जाते. ग्रामीण भाषेत काही ठिकाणी याला 'वडाप' तर काही ठिकाणी 'काळी-पिवळी' असे संबोधले जाते.अनेकदा संबंधित वाहन धारकांकडे त्यासाठीचा योग्य, आवश्यक परवाना नसतो, वाहनात क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी बसवले जातात. भरधाव धावणारी ही वाहने अनेकदा अपघाताला निमंत्रण देतात. मागील महिन्यात विदर्भातील वडूर-राजुरा बाजार मार्गावर तीन आसनी रिक्षाचा अपघात झाला. या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. या रिक्षामध्ये अवैधरीत्या सात प्रवासी प्रवास करत होते. अशा प्रकारे क्षमतेपेक्षा अधिक संख्येने प्रवासी घेऊन जाणारी वाहने प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण करतात. दुर्दैवाने अशा वाहनांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अपघातानंतर विम्याची मदतही मिळत नाही.

**ट्रॅव्हल्स कंपन्यांची मक्तेदारी**

एसटीसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील काही उणिवांचा फायदा घेत राज्यभरात ट्रॅव्हल्स कंपन्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांना त्यांच्या सोयीप्रमाणे सेवा देणाऱ्या या ट्रॅव्हल्स कंपन्या अनेकदा परिवहन विभागाचे नियम धाब्यावर बसवून प्रवासी वाहतूक करत असल्याचे दिसते. टप्पा वाहतुकीसाठी कोणतीही परवानगी नसताना अनेक ट्रॅव्हल्स कंपन्या मार्गातील विविध ठिकाणी प्रवाशांची अवैधरीत्या वाहतूक करतात. खासगी वाहतूक करणारे चालक मद्यपान करून वाहन चालवीत असल्या संदर्भातील तक्रारीही वारंवार समोर येत असतात. इतकेच नव्हे; तर ४० आसनी बसमध्ये कोणतीही अधिकृत परवानगी न घेता बदल करून ५५ ते ६० आसनांची क्षमता निर्माण केली जाते. सोबत, वाहनाच्या डिक्कीतून अवैधरीत्या मालवाहतूकही केली जाते. अनेकदा हे सर्व प्रकार प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सुरू असल्याची चर्चा होते.

**कार पूलिंगचे नवे आव्हान**

अलीकडच्या काळात कार पूलिंग या संकल्पनेने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोर एक नवे आव्हान उभे केले आहे. या प्रकारात अनेक कारचालक प्रवासी वाहतुकीचा कोणताही परवाना नसतानाही विशिष्ट मोबाइल पच्या माध्यमातून प्रवासी गोळा करतात आणि कमी दरात ठरावीक ठिकाणी नेण्याची सुविधा देतात. मुंबई-पुणे मार्गावर हा प्रकार मोठ्या प्रमाणात वाढला असून त्याचा फटका एसटीच्या शिवनेरीसारख्या प्रस्थापित बससेवेला देखील बसत असल्याचे दिसून येते. परवाना, विमा, फिटनेस आणि इतर आवश्यक अशा नियमांचे पालन न करता वाहतूक केल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होतो. अपघाताच्या प्रसंगी अशा वाहनांमधील प्रवाशांना कोणतीही कायदेशीर सुरक्षा मिळत नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.याशिवाय अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलावरही परिणाम होत असतो. अधिकृत परवाने, कर आणि शुल्क न भरता वाहतूक केल्यामुळे शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक तोटा सहन करावा लागतो. त्याचबरोबर एसटी महामंडळ, अधिकृत टॅक्सी, रिक्षा आणि इतर कायदेशीर वाहतूकदारांना याचा फटका बसतो. नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या या घटकांपुढे अवैध वाहतुकीमुळे अन्यायकारक स्पर्धा निर्माण होते. अवैध प्रवासी वाहतुकीचा आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे वाहतूक कोंडी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न. कोणत्याही नियंत्रणाशिवाय रस्त्यावर उतरलेली वाहने शहरांमध्ये गोंधळ आणि वाहतूक कोंडी वाढवतात. त्यामुळे संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर ताण निर्माण होतो.या सर्व पार्श्वभूमीवर अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज बनली आहे. सरकारने हाती घेतलेली कारवाई ही केवळ दंडात्मक नसून सुरक्षित, शिस्तबद्ध आणि पारदर्शक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे, असे म्हणता येईल. सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था मजबूत राहण्यासाठी नियमांचे काटेकोर पालन होणे अत्यावश्यक आहे. म्हणूनच अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलणे आणि नागरिकांनीही कायद्याचे पालन करणे निकडीचे आहे. सुरक्षित आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी ही जबाबदारी शासनासोबत समाजाचीही आहे. अवैध प्रवासी वाहतुकीचे हे वाढते सावट दूर करूनच राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला लागलेले हे ग्रहण दूर होऊ शकते, अशी खात्री वाटते.

# भीमनगर जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे भव्य आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**


भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमनगर येथे जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी भीमनगर जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, तरुण मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समितीच्या अध्यक्षपदी सचिन टाकणखार यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी किशोर भाऊ सातपुते, कोषाध्यक्षपदी शिशिर प्रधान, सचिवपदी अनिल डोंगरे, सहसचिवपदी रवि सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच राहुल मस्के यांची संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय समितीच्या सल्लागारपदी प्रदीप पट्टेकर, कपिल वाघमारे व सदानंद भैया प्रधान यांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शक म्हणून कचरु तात्या खळगे, राजेश साळवे, नवनाथ धाईजे व अंकुश जाधव यांचा समावेश करण्यात आला आहे.

या जयंती उत्सवानिमित्त भीमनगर परिसरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच जयंती उत्सव मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही समितीच्या वतीने करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.



या बैठकीस अंबऋषी स्वामी, टी. आर. जावळे, प्रदीप साळवे, राजेंद्र टाकणखार, गणेश जावळे, अक्षय साळवे, संतोष घाडगे, संजय ससाणे, गौतम टाकणखार, संदेश डोंगरे, राहुल निसर्गंध, विजय राऊत, रवि टाकणखार, प्रकाश शिंदे, राम गायकवाड, विजय पोळ, नरहरी जावळे, दिनेश धाईजे, अनंत वाघमारे, राजरत्न खळगे, राजपाल जावळे, सचिन वाघमारे, सतीश स्वामी, शंकर चव्हाण, दिलीप भालेराव, नितीन ससाणे, अनंत कांबळे, गब्बर ससाणे, निलेश कांबळे, प्रवीण निसर्गंध, मुसा धापसे, धम्मपाल जावळे, आकाश सावंत, केतन प्रधान, प्रवीण ओव्हाळ, सिद्धार्थ लोखंडे, साजण साळवे, स्वप्नील स्वामी, भारत ओव्हाळ, प्रकाश खळगे, सुशांत फुलवरे, राज सोनवणे, सिद्धार्थ निसर्गंध, सचिन पट्टेकर, नंदकिशोर निसर्गंध, संदेश निसर्गंध, अनिल गाडेकर, ऋषिकेश पट्टेकर, आदेश धाईजे, संकेत खळगे, दिपक साळवे, दिपक शिंदे, अमोल खळगे, मंगेश पोळ, सतीश जाधव, मिलिंद खळगे, ऋषिकेश, सोनवणे, विशाल सोनपसारे, सुबोध खळगे, विनोद शिंदे, सुजल खळगे, ड.चेतन सातपुते, मयुर प्रधान, रुपेश वाल्मिकी, रितेश शिनगारे, अमोल गायकवाड, सारंग स्वामी, रविराज भालेराव, विश्वजित साळवे, राहुल कांबळे, पवन उजगरे, निखिल टाकणखार, अविनाश गायकवाड, झग उजगरे, लखन निसर्गंध, शशिकांत साळवे, भागवत गाडेकर, प्रकाश निसर्गंध, गोगा कांबळे, किरण जावळे, प्रतीक जाधव, गब्बर निसर्गंध, आशिष धाईजे आदी उपस्थित होते.

# युद्धजन्य परिस्थितीचे सावट झुगारुन 'लीना गॅस'कडून पुरवठा सुरळीत; ग्रामीण भागाला मिळाला मोठा दिलासा

## प्रशासकीय पाहणीत कामकाज समाधानकारक; बोरद परिसरातील ३२१० ग्राहकांना विनासायास सेवा


**सध्या युद्धजन्य परिस्थिती असल्यामुळे वेळोवेळी आम्हालाही शासनाकडून सूचित करण्यात येत आहे की पुरवठ्यावर योग्य लक्ष द्यावे आणि त्याच अनुषंगाने आम्ही ग्राहकांशी सुसंवाद साधून त्यांना योग्य पद्धतीने बुकिंग बाबत मार्गदर्शन करून करण्यात आलेल्या प्री-बुकिंगच्या अनुषंगानेच एलपीजी सिलेंडरचा पुरवठा करत आहोत त्यामुळे पुरवठा करण्यास कुठलीही अडचण भासत नाही. भविष्यात पुरवठा आमच्याकडे शासनाकडून झाला नाही तर मात्र परिस्थिती हाताळण्यास अडचण निर्माण होऊ शकते.**

**-अभिषेक चौधरी,संचालक (लीना इंडेन दुर्गम क्षेत्रीय वितरक बोरद ता. तळोदा )**

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

सध्या अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे जागतिक स्तरावर इंधन पुरवठ्याबाबत अनिश्चिततेचे वातावरण आहे. याचा परिणाम म्हणून अनेक ठिकाणी एलपीजी सिलेंडरच्या तुटवड्याची भीती व्यक्त केली जात आहे. मात्र, तळोदा तालुक्यातील बोरद येथील 'लीना इंडेन दुर्गम क्षेत्रीय वितरक एजन्सी' ने आपल्या उत्कृष्ट नियोजनातून ग्रामीण भागासाठी एक सकारात्मक आदर्श निर्माण केला आहे.तळोदा तालुक्यातील काही भागात तांत्रिक अडचणींमुळे गॅस सेवा विस्कळीत झाल्याची चर्चा असताना, तालुका पुरवठा निरीक्षक द्वारका आगळे यांनी बोरद येथील लीना गॅस एजन्सीला भेट देऊन साठ्याची आणि पुरवठा साखळीची बारकाईने पाहणी केली. या तपासणीत एजन्सीचा कारभार सर्वार्थाने समाधानात्मक आढळला. संचालक अभिषेक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली गॅसचा साठा आणि वितरण प्रक्रिया अतिशय शिस्तबद्ध असल्याचे प्रशासनाला दिसून आले आहे.लीना गॅस एजन्सीकडे सध्या एकूण ३२१० नोंदणीकृत ग्राहक असून, त्यात १४.२ किलोचे ३१९१ घरगुती सिलेंडर ग्राहक आहेत. तर १० किलोचे १४ ग्राहक असून १९ किलोचे ५ ग्राहक आहेत.युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या भीतीदायक वातावरणातही एजन्सीने पुरवठा विस्कळीत होऊ दिलेला नाही. ग्राहकांना नोंदणीनुसार



वेळेत आणि सरकारी ठरलेल्या दरात सिलेंडर उपलब्ध करून दिले जात असल्याने ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

**ग्रामीण ग्राहकांचे संयमी नियोजन**

या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामीण भागातील ग्राहकांची भूमिकाही महत्त्वाची ठरली आहे. ग्रामीण भागातील ग्राहक अत्यंत जागरूकपणे एलपीजीच सिलेंडरचा वापर करतात. साधारणपणे दीड ते दोन महिन्यांच्या अंतराने सिलेंडरचे बुकिंग होत असल्याने मागणी आणि पुरवठ्याचा ताळमेळ उत्तम राखला गेला आहे. सिलेंडरची बचत करण्याची आणि गरजेनुसारच वापर करण्याची ग्रामीण ग्राहकांची शिस्त, एजन्सीच्या नियोजनाला अधिक बळकटी देत आहे.प्रशासनाची सतर्कता आणि एजन्सीचे जबाबदार व्यवस्थापन यामुळे बोरद परिसरात इंधन टंचाईचे कोणतेही सावट नाही. अधिकारी आणि एजन्सी संचालक यांच्यातील पारदर्शक संवादामुळे ग्रामीण भागातील सामान्य जनतेला अत्यावश्यक सेवा विनासायास मिळत आहे, हे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

**बोरद येथील गॅस एजन्सीला दिनांक १४ रोजी भेट दिली असता त्या ठिकाणाहून उपलब्ध साठा आणि एकूण ग्राहक संख्या जाणून घेतली उपस्थित ग्राहकांशी चर्चा केली त्यामुळे एकंदरीतच संबंधित वितरकाच्या माध्यमातून पुरवठा योग्य तऱ्हेने होत आहे.**

**-द्वारका आगळे. तालुका पुरवठा निरीक्षक( तळोदा जि. नंदुरबार)**

**मी गेल्या पंधरा दिवसापासून गॅस नोंदणी केलेली होती अचानक रात्री एलपीजी सिलेंडर संपले दुसऱ्या दिवशी मी लागलीच बोरद येथील वितरकाकडे एलपीजी सिलेंडर घेण्यासाठी गेलो असता त्यांनी माझ्याकडून नोंद याआधीच झाल्याबाबत पडताळणी करून घेतले आणि क्षणाचाही विलंबना लावता मला एलपीजी सिलेंडर उपलब्ध करून दिले. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या परिस्थितीचा बोरद येथील वितरकांवर कुठल्याही प्रकारचा परिणाम नाही.**

**-सुभाष पावरा,एलपीजी ग्राहक (करडे ता.तळोदा )**

# शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा (SQAAF) अंतर्गत बाह्य मूल्यांकनात साने गुरुजी निवासी विद्यालयास (अ+) दर्जा प्राप्त

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शाळांचे मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे येथे राज्य शाळा मानांकन प्राधिकरण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळां साठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखड्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. शाळांचे स्वयं मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे यांच्या ारर.रल.ळप या वेबसाईटवरील SQAAFमुल्यांकनासाठी scert-data.web.app ही लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती.सन २०२४-२५ मध्ये राज्या तील१,०२,६७५ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. सन २०२४-२५मध्ये स्वयं मूल्यांकनामध्ये सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या शाळां पैकी सन २०२५-२६ मध्ये १०७१२शाळांची बाह्य मूल्यांकन करण्या साठी निवड करण्यात आली होती.त्यापैकी १०६४४ शाळांचे मूल्यांकन पूर्ण करण्यात आले.यात बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी प्राथमिक विद्यालय केज,साने गुरुजी निवासीमाध्यमिक विद्यालय केज,व साने गुरुजी उच्च माध्यमिक विद्यालय केज या तीनही शाळांना स्वयं मूल्यांकन व त्रयस्थ व्यक्तींकडून केलेले बाह्य मूल्यांकन यात सर्वाधिक गुणप्राप्त होऊन (अ प्लस) श्रेणी प्राप्त झाली आहे.राज्या तील




४० शाळांमध्ये या तीनही शाळा असून नुकतेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षणसंस्था अंबेजोगाईच्या वतीने शाळेस अभिनंदनाचे पत्र प्राप्त झाले आहे.दर्जा प्राप्त झाल्यानंतर शाळेच्या दर्शनी भागात व शाळेच्या लेटरहेडवर (अ प्लस )श्रेणी प्राप्त असा उल्लेख करण्याचे आदेश पत्रान्वये देण्यात आलेले आहे.तसेच पुढील वर्षी राज्यातील शाळांना सदर शाळेचे पुरावे महाराष्ट्र राज्याच्या www.maa.ac.in. वेबसाईटवरपाहण्यासाठी व मार्गदर्शनासाठी उपलब्ध करून दिलेले आहेत.केज तालुक्यातून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित,साने गुरुजी निवासी विद्यालय तीनही शाळां (अ+) श्रेणी आल्याबद्दलजिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबेजोगाई चे प्राचार्य डॉ.अनिल मुरकुटे सर,सहाय्यक आयुक्त कार्यालय बीडचे सहाय्यक आयुक्त श्री. क्षिरसागर साहेब,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबेजोगाईच्या वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ. भागीरथी गिरी तालुक्याचे समन्वयक व वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.जयपाल कांबळे सर, डॉ.गोरे सर,डॉ.सुरवसे सर,डॉ.देशमुख सर,श्री. बारगजे सर, गटशिक्षणाधिकारी कार्यालय केजचे गटशिक्षण अधिकारी श्री. सुनील केंद्रे ,ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता आबा चाटे,केज केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.संजय चौरे यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.सदर शाळेचे संस्थापक अध्यक्ष अड.उद्धवराव कराड साहेब व संस्था उपाध्यक्ष राजेश कापसे यांनी प्राचार्य तथा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांचे संस्थेच्या वतीने कौतुक केले आले आहे.

# बारा ज्योतिर्लिंगांच्या पदयात्रेवर निघालेल्या भाविकाचे नरसी फाट्यावर उत्स्फूर्त स्वागत

## धर्म, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा संदेश

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**




देशातील बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेण्याच्या दृढ संकल्पाने सुमारे सात हजार किलोमीटरची पदयात्रा करणारे उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यातील प्रकाश प्रतापसिंग उर्फ 'काली दादा' यांचे रविवारी (दि.१५ मार्च) नरसी फाटा येथे आगमन झाले. त्यांच्या या धार्मिक पदयात्रेचे जनसेवा फाउंडेशनचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष गजानन पाटील चव्हाण यांच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

भगवान शिवावरील अखंड श्रद्धा आणि देशातील सर्व नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्याच्या भावनेतून प्रकाश प्रतापसिंग यांनी ही पदयात्रा सुरू केली आहे. भारतातील बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेताना देशातील लोकांच्या कल्याणासाठी, आर्थिक प्रगतीसाठी तसेच सर्वांना उत्तम आरोग्य लाभावे, अशी प्रार्थना ते करीत आहेत. या यात्रेदरम्यान विविध राज्यांमधून प्रवास करत ते महाराष्ट्रात दाखल झाले असून त्यांच्या भक्तीमय प्रवासाला अनेक ठिकाणी नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

नरसी फाटा येथे त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील चव्हाण तसेच विविध धर्मीय समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित झाले. गजानन पाटील चव्हाण यांच्या पुढाकाराने पदयात्री भाविकाचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. यावेळी भाविकांना पाणी, भोजन तसेच फळे देऊन सेवा जनसेवा फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली.

विशेष म्हणजे सध्या सुरू असलेल्या रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील बांधवांनीही या स्वागत सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. हिंदू-मुस्लिम समाजबांधवांनी एकत्र येत पदयात्री भाविकाची सेवा करत सामाजिक सलोखा आणि धार्मिक ऐक्याचा सुंदर संदेश दिला. त्यामुळे हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरला आहे.

या प्रसंगी रफोदीन टेंभुर्णीकर, शेख हैदरसाब, शेख सलीम, किशोर महाराज धर्माबादकर, गंगाधर कुडके,शेख रफीक, शेख मोईन, माधवराव चव्हाण, संतोष वाघमारे, नवीनभाई मांजरमकर, बाळू गिरी नरसीकर, शेख आयान, शेख सोहेलभाई उपस्थित होते.

---

### हास्यजत्रा फेम अभिनेते पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब उटी ला भेट

## उटी ग्रामस्थांनी अभिनेता पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब यांचे गावात वाजत गाजत बैलगाडीतुन स्वागत

दैनिक वादळ वार्ता
**जिवन । प्रतिनिधी**



औसा तालुक्यातील उटी बु येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत असुन हे केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता, ते आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग बनले पाहिजे.

अत्यंत आनंद आणी अभिमानाची गोष्ट की, औसा तालुक्यातील उटी (बु.) गावाने राबविलेल्या विकासकामांची आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची पाहणी करण्यासाठी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेते पृथ्वीक प्रताप आणि अभिनेत्री शिवाली परब यांनी आपल्या उटी गावाला भेट दिली.

स्मार्ट सिटीच्या काळात 'स्मार्ट व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवणाऱ्या उटी ग्रामपंचायतीचे पृथ्वीक यांनी भरभरून कौतुक केले. विशेषतः विधवा महिलांच्या सन्मानासाठी ग्रामपंचायतीने उचललेले मोठ पाऊल पाहून शिवाली परब यांनी व्यक्त केलेले भावनिक उद्गार उटी ग्रामपंचायतच्या कामाची खरी पावती आहे.

उटी बु गावच्या या प्रवासात मोलाचे मार्गदर्शन आणि पाठबळ देणाऱ्या उटी ग्रामस्थासह सर्वांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानन्यात आले यावेळी

प्रमुख उपस्थिती: अभिनेते पृथ्वीक प्रताप आणि अभिनेत्री शिवाली परब.सह

मार्गदर्शक: श्री. बाळासाहेब वाघ (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. लातूर), श्री. आनंदकुमार मिरगणे (गटविकास अधिकारी, पं.स. औसा).गावचे विकासभिमुख

नेतृत्व: सरपंच सौ. वैशाली कांबळे, उपसरपंच श्री. रफिक शेख, मा सरपंच ड. भालचंद्र पाटील.

कार्यक्रमाचे नियोजन: ग्रामपंचायत अधिकारी श्री. महेश जगताप व सर्व ग्रामपंचायत सदस्य.उटीचे जागरूक ग्रामस्थ! अभिनेता व अभिनेत्री यांनी ग्रामस्थांशी संवाद साधताना गावातील लोकांचा एकोपा, प्रत्येक कार्यक्रमात सहभाग आणी सामाजिक बांधिलकी यामुळेच आज उटी गावाची दखल राज्यस्तरावर घेतली जात आहे. हे गाव नक्कीच बक्षीसास पात्र ठरेल, असा विश्वास सार्थ करण्यासाठी आपण सर्वजण मिळून उटीला एक आदर्श गाव बनवण्याचे सांगीतले !!!,,,

---

## दौंड तालुक्याच्या पूर्व भागात लॉजवर अनैतिक देहविक्रीचा सुळसुळाट ?

### पोलिसांकडून कारवाईसाठी टाळाटाळ ?

दैनिक वादळ वार्ता
**दौंड । प्रतिनिधी**

दौंड तालुक्याच्या पूर्व भागात काही हॉटेल व लॉजमध्ये अनैतिक देहविक्रीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. हॉटेलच्या नावाखाली समोर खानावळ किंवा नॉनव्हेज हॉटेलचे फलक लावले जात असले तरी पाठीमागील लॉजमध्ये मात्र अनैतिक देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे अनेक ठिकाणी पुढे हॉटेल व पाठीमागे लॉज अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली असून,त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी संशयास्पद हालचाली वाढल्याचे नागरिकांचे निरीक्षण आहे.

काही लॉज तसेच रस्त्यालगत असलेल्या ढाब्यांवरही या प्रकारचा व्यवसाय सुरू असल्याचे बोलले जात असून तेथे तथाकथित 'आंबट शौकिनांची' मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

या व्यवसायातून दररोज लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.त्यामुळे अशा अनधिकृत व्यवसायांना अभय कोणाचे आहे,असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.काही ठिकाणी तर हा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याने स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

याबाबत पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे का,किंवा कोणत्या आर्थिक दबावाखाली कारवाई होत नाही का,असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.या मागे मोठे आर्थिक गणित कार्यरत असल्याचीही चर्चा परिसरात सुरू आहे.

दरम्यान,या बेकायदेशीर देहविक्रीच्या व्यवसायांवर तात्काळ कारवाई करून परिसरातील वातावरण स्वच्छ करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.प्रशासनाने याची गंभीर दखल घेऊन चौकशी करून योग्य ती कारवाई करावी,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

## महागांव/महाराष्ट्र शासन, वस्त्रोद्योग महारेशीम तुती शेती अभियानाचे जनूना येथे शिबिर

दैनिक वादळ वार्ता
**महागाव । प्रतिनिधी**




रेशीम उद्योग प्रशिक्षण व नोंदणी शिबीर श्री/ बाबुराव पुंडलिक वाठोरे जनुना. यांनी गेल्या पाच ते सहा वर्षा पासून शेती उत्पन्नात रेशीम उद्योगाचा. बाबुराव पुंडलिक वाठोरे यांचा तुती रेशीम लागवड व रेशीम कोष उत्पादन करिता ललित येवले वरिष्ठ अधिकारी व स्वप्निल कावळे तांत्रिक सहाय्यक यांच्या मार्गदर्शनात बाबुराव वाठोरे यांच्या तुती शेतीची पाहणी केली. महाराष्ट्र राज्यामध्ये सूची रेशीम लागवड जोडधंदा असून महाराष्ट्र शासन वस्त्र उद्योग विभाग रेशीम संचालनालय नागपूर उद्योगातून एक राज्यातील सुमारे १६,००० शेतकरी यशस्वीरीत्या ह्यवसाय करीत असून त्यांना एक एकर तुती लागवड आणि किटक संगोपन व त्यापासुनचा कोष उत्पादनातून वार्षिक किमान २.५० ते ३.०० लक्ष रुपये इतके सरासरी उत्पन्न मिळत आहे. यवतमाळ जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील जनुना शेत शिवारात बाबुराव पुंडलिक वाठोरे यांचे एकरी वार्षिक उत्पन्न अडीच ते तीन लाख रुपये पर्यंत होत असून यवतमाळ जिल्ह्यात रेशीम महा शिबिराचे आयोजन आता शेतकरी रेशीम शेतीकडे वळत असून हा व्यवसाय करणाऱ्यांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावले आहे. त्यांचे प्रमाणे आपणही आपले शेतीमध्ये रेशीम वाढवण्याची प्रतिक्रियांची शिबिर.महाराष्ट्र राज्यामध्ये तुती रेशीम लागवड व रेशीम कोष उत्पादन प्रकल्प शासनाचे पुढीलप्रमाणे योजनांच्या माध्यमातून राबविण्यात येण्याची योजना.१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना २) सिल्क समग्र २ योजना ३) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा-२ या योजनांद्वारा नोंदणीकृत लाभार्थी शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य अनुदान देण्यात येते, तसेच संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शन व प्रशिक्षणही देण्यात सक्षम.

दिनांक : १०/ ३/ २०२६,

जनूना परीसरातील यशस्वी व अनुभवी शेतकरी बाबुराव पुंडलिक वाठोरे व रेशीम शेतकरीही आपले या शिबीरामध्ये उपस्थित

---

### मांडवी सर्कल मध्ये मटका...सट्टा आणि दारू 'चा सुळसुळाट?

## मोबाईल ऑनलाइन सट्ट्याच्या विळख्यात मजूर वर्ग आदिवासी कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याची भीती

दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**



मांडवी सर्कल मध्ये सध्या ( ये..का..दुरी.. पत्याच..रमी )आणि ऑनलाइन सट्टा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. मांडवी सर्कल मध्ये विविध भागांत उघडपणे सट्टा घेतला जात असून, यामध्ये सर्वाधिक फटका सामान्य मजूर व कष्टकरी वर्गाला बसत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

दिवसभर कष्ट करून २०० ते ४०० रुपये मजुरी कमावणारा सामान्य मजूर या सट्ट्याच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. पैसे दुप्पट होतील या आमिषाने काही जण ऑनलाइन सट्ट्यात पैसे टाकतात; मात्र बहुतांश वेळा त्यांचे कष्टाचे पैसे पाण्यात जात आहेत. परिणामी अनेक कुटुंबांमध्ये आर्थिक तणाव निर्माण होऊन घरातील वातावरण बिघडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

याशिवाय काही भागांत अवैध देशी दारू विक्री आणि इतर बेकायदेशीर धंदेही सुरू असल्याची चर्चा आहे. सट्टा, दारू आणि इतर अवैध व्यवसायांमुळे सामाजिक वातावरण बिघडत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे या सर्व प्रकारांबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी होत असतानाही पोलीस प्रशासन मात्र कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे या सट्टा माफियांवर कारवाई नेमकी कोण करणार.....? असा प्रश्न आता नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

मांडवी सर्कल मध्ये वाढत्या सट्टा व्यवसायामुळे तरुण पिढीही चुकीच्या मार्गावर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून सट्टा व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे...

---

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५व्या जयंती महोत्सव समिती जाहीर

## माजी सैनिक रावसाहेब रोडे यांच्या अध्यक्षते खाली मिलिंदनगर जयंती उत्सव समिती ची निवड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



महामानव बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवानिमित्त मिलिंद नगर येथील समाज मंदिर (बौध्दविहार) मिलिंद नगर येथील उपासक-उपासिका यांची बैठक सम्पन्न झाली दिनांक १२.मार्च २०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली. ही बैठक माजी सैनिक.रावसाहेब रोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.कार्यक्रमाची सुरुवात खेळीमेळीच्या रूपात उपस्थितांनी पार पडली मिलिंद नगर येथील जयंती उत्सव समितीस एकमताने मान्यता दिली. यानंतर सर्व उपस्थितांच्या चर्चेनंतर व मिलिंदनगर भागातील उपासक व उपासिका यांच्या एकमताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती महोत्सव समिती पुढीलप्रमाणे निवडण्यात आली.अध्यक्ष -(संघपाल कसबे )उपाध्यक्षपदी (दीपमाला सावंत )सचिवपदी (प्रा. सुशीलकुमार सरवदे )कोषाध्यक्षपदी (मिलिंद वाघमारे )अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात बिनविरोध निवड करण्यात आली या महत्वपूर्ण बैठकीसाठी तुरूणांची व महीलांची उपस्थित मोठ्या प्रमाणात होती बैठकीच्या सुरवातीस महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली या बैठकीला विद्यमान नगरसेवक अल्ताफ पठान यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व या बैठकीस माझी नगरसेवक रवि मुळे व प्रा.अजयभाऊ गंडले, अतिषभाऊ आदोडे,सुयोग सुर्यवंशी सर, नागेश व्हावळे, संतोष काळे, दयानंद गोदाम, अरविंद धिवार,तक्षशिला(टाळु) भद्रे,रिंकु भद्रे, तसेच प्रजावतीताई आचार्य, सत्यभामाबाई काळे, सरस्वती बनसोडे ,आदोडे आई ,शोभाताई गोदाम, संध्याताई लोंढे, जयश्रीताई धिवार ,गौळनबाई काळे. व नगरातील असंख्य तरुन मोठ्या संख्येने उपस्थित होते व ही झालेली बैठक महेश (भैया) गायकवाड यांनी बैठकीसाठी अथक प्रयत्न कले व ही बैठक यशस्वी व खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

---

## गडचांदूर शहरात सट्टा 'झेंडीमुंडी'चा सुळसुळाट; पोलिसांचे दुर्लक्ष की मौनसंमती?

### ऑनलाइन सट्ट्याच्या विळख्यात मजूर वर्ग; कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होण्याची भीती

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**



गडचांदूर शहरात सध्या झेंडीमुंडी व ऑनलाइन सट्टा मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. शहरातील विविध भागांत उघडपणे सट्टा घेतला जात असून, यामध्ये सर्वाधिक फटका सामान्य मजूर व कष्टकरी वर्गाला बसत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

दिवसभर कष्ट करून ४०० ते ५०० रुपये मजुरी कमावणारा सामान्य मजूर या सट्ट्याच्या आहारी जात असल्याचे दिसून येत आहे. पैसे दुप्पट होतील या आमिषाने काही जण ऑनलाइन सट्ट्यात पैसे टाकतात; मात्र बहुतांश वेळा त्यांचे कष्टाचे पैसे पाण्यात जात आहेत. परिणामी अनेक कुटुंबांमध्ये आर्थिक तणाव निर्माण होऊन घरातील वातावरण बिघडत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

याशिवाय शहरातील काही भागांत अवैध दारू विक्री आणि इतर बेकायदेशीर धंदेही सुरू असल्याची चर्चा आहे. सट्टा, दारू आणि इतर अवैध व्यवसायांमुळे सामाजिक वातावरण बिघडत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

विशेष म्हणजे या सर्व प्रकारांबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी होत असतानाही पोलीस प्रशासन मात्र कानाडोळा करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. त्यामुळे या सट्टा माफियांवर कारवाई नेमकी कोण करणार? असा प्रश्न आता नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

गडचांदूर शहरातील वाढत्या सट्टा व्यवसायामुळे तरुण पिढीही चुकीच्या मार्गावर जाण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने लक्ष घालून सट्टा व अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# मॅरेथॉनच्या यशात नर्सिंग विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा-प्रा.अर्जुन राठोड

## महिला मॅरेथॉनमध्ये सेवा देणाऱ्या नर्सिंग विद्यार्थ्यांचा गौरव

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

महिला मॅरेथॉन स्पर्धेदरम्यान स्पर्धकांच्या आरोग्याची दक्षता घेत नर्सिंग विद्यार्थ्यांनी प्राथमिक उपचार, पाणी व ऊर्जा पेयाची व्यवस्था करत महत्त्वाची सेवा बजावली. त्यांच्या या योगदानामुळे स्पर्धा सुरक्षित आणि यशस्वीपणे पार पडली, असे प्रतिपादन अचिव्हर्स अकॅडमीचे संचालक प्रा. अर्जुन राठोड यांनी केले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने ८ मार्च रोजी आयोजित महिला मॅरेथॉनमध्ये आपत्कालीन मदत व आरोग्य सेवा देणाऱ्या तुलसी नर्सिंग कॉलेज व माता रमाई नर्सिंग कॉलेज येथील विद्यार्थ्यांचा अभिनंदन व गौरव सोहळा शनिवारी आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

या गौरव सोहळ्यास नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी. डी. राऊत, ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य प्रकाश ढोकणे, डॉ. विकास वाघमारे, प्रा. किशोर वाघमारे, प्रा. हनुमंत विद्यागर, उपप्राचार्य मिलिंद वडमारे तसेच विभागप्रमुख अब्रार पठाण आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी प्राचार्य डी. डी. राऊत यांनी नर्सिंग विद्यार्थ्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक करत मॅरेथॉनदरम्यान त्यांनी दाखवलेली तत्परता आणि जबाबदारी ही नर्सिंग शिक्षणाची खरी ओळख असल्याचे सांगितले.मॅरेथॉनदरम्यान काही स्पर्धकांना थकवा किंवा पायात पेटके येण्याची समस्या निर्माण झाली. अशा वेळी नर्सिंग विद्यार्थ्यांनी तत्परतेने प्राथमिक उपचार, पाणी व ऊर्जा पेय उपलब्ध करून देत स्पर्धकांना मदत केली. त्यांच्या या सेवाभावी कार्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.तसेच प्रा. प्रतीक्षा वेडे व प्रा. सुप्रिया वाघमारे यांनी स्पर्धकांची नोंदणी व नियोजन प्रभावीपणे पार पाडत महिलांना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिया चक्रे तर आभार प्रा. सोहेल इनामदार यांनी मानले. यावेळी नर्सिंग कॉलेजचे सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बडे बाबा महाराज यांची यात्रा संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**शेख नसीर**



सर्व धर्मांमधील एकतेचे प्रतीक व लहुरी गावचे ग्रामदैवत बडे बाबा महाराज यांची यात्रा संपन्न झाली . पालखी मिरवणूक उत्साहात साजरा करण्यात आले दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दि केली बाल-गोपाळांसह महिला, ग्रामस्थांनी गर्दी केली होती. आरती नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम घेण्यात येतो यात्रा चे कार्यक्रम पार पाड ण्यात सहकार्य करणारे गावचे सरपंच चाळक पंडित वसंतराव. उप सरपंच विजय चाळक ग्रामसेवक गायसमुद्रे साहेब .रंजित चाळक कृष्णा जगताप विठ्ठल चाळक प्रमोद चाळक .नसीर बाबा पत्रकार सर्व पदाधिकारी उपस्थित होते...यात्रोत्सवाचा थाटात समारोप झाला.

# आष्टीत 'दावत-ए-इफ्तार'चा स्नेहमेळावा

## हिंदू-मुस्लिम ऐक्याचा उज्ज्वल संदेश

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमाने सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि एकतेचा सुंदर संदेश दिला. धार्मिक वातावरण, आपुलकीचा भाव आणि परस्पर स्नेहाने भारलेल्या या सोहळ्यात आष्टीतील विविध समाजघटकांतील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ.सुरेशकुमार



जेथलिया आणि बाबाजानी दुर्रानी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत सर्व धर्मीय बांधवांनी एकत्र येत इफ्तार केला. या प्रसंगी समाजात प्रेम, सौहार्द, परस्पर आदर आणि बंधुभाव अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.हाजी रहेमतखान यांच्या मेजवानीत आयोजित या इफ्तार सोहळ्यात आष्टीतील हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी एकत्र बसून इफ्तार करत गंगा-जमुनी संस्कृतीचे जिवंत उदाहरण घडवले. परस्पर स्नेह, एकोपा आणि सामाजिक ऐक्याची भावना या प्रसंगी प्रकर्षाने जाणवली.शेवटी कार्यक्रमाचे आयोजक हाजी रहेमतखान यांनी उपस्थित मान्यवर, नागरिक आणि सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजातील प्रेम, विश्वास आणि एकतेची भावना अधिक बळकट होत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

# माजलगावात राजे मल्हारराव होळकर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

राजे मल्हारराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव शहरात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करून राजे मल्हारराव होळकरांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात राजे मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पिवळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राजे मल्हारराव होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या शौर्यपूर्ण आणि जनकल्याणकारी कार्याची आठवण करून दिली.

या कार्यक्रमाला माजलगाव शहरातील उपनगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके , माजी समाज कल्याण सभापती कल्याण आबुज ,नगरसेवक शरद यादव ,अर्जुन नाईकनवरे, आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे, मा. जि प सदस्य बबनराव सरवदे, मा.जी.प. सदस्य प्रकाश गवते, शिवसेना शहरप्रमुख पापा सोंळके, युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे, युवा शेतकरी संघटनेचे अजय राउत, नारायण सातपुते, जगन्नाथ शिंदे ,अविनाश कांडुरे, सरपंच राज अर्जुन, सुभाष गडदे, संतोष देवकते ,रोहीत वगरे , ओबीसी महासंघाचे तालुकाध्यक्ष शामसुंदर पांचाळ, धोंडीराम जाधव, भगवानराव धरपडे, शंकर गावडे, राम आबुज, गोविंद गोचडे अशोक चोरमले, सर्वच राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी एकत्र येत राजे मल्हारराव होळकर यांना अभिवादन केले आणि त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचा संकल्प व्यक्त केला.या कार्यक्रमाचे आयोजन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने , मल्हार सेनेचे कार्याध्यक्ष अशोक डोणे, व त्यांच्या कार्यकर्त्यांनी केले होते. शहरात जयंतीनिमित्त उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.



# गागलेगांव येथील अखंड हरिनाम सप्ताहाची पुरणपोळीच्या महाप्रसादाने सांगता

दैनिक वादळ वार्ता

**हनुमंत चंदनकर । नांदेड**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या हनुमान मंदिर गांगलेगांव येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज दिनांक १५ मार्च रोजी ह भ प श्री कोकाटे महाराज यांच्या काल्याच्या किर्तन व पुरणपोळी महाप्रसादानी झाली हरी कीर्तनानंतर हनुमान मंदिराच्या जमिनीचा कोर्टाचा निकाल हनुमान मंदिर व गावकऱ्यांच्या बाजूने लागल्याने गावातील खटला चालवणारे वकील श्री नागनाथ बुद्धलवाड यांचा यावेळी हनुमान मंदिर ट्रस्ट व गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला अखंड हरिनाम सप्ताह महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार गुणीजन गायक वादक, टाळकरी माळकरी साधू संत मंथ कीर्तनकार प्रवचनकार यास हजारो भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# स्वातंत्र्य सैनिक तथा शिक्षक शंकर राव काळेगावकर अनंतात विलीन



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

स्वातंत्र्य सैनिक तथा जिल्हा परिषदेचे शिक्षक मराठवाडा मुक्तीसंग्रामचे सैनिक श्री.शंकरराव काळेगावकर यांचे वयाच्या ९७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. शंकरराव काळेगावकर हे अतिशय शिस्तप्रिय व स्वावलंबी असे करारी बाण्याचे व्यक्तिमत्त्व होते भारतीय सैन्य दलातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्य केले हे जिल्हा परिषदेच्या अनेक पिढ्या त्यांनी घडवल्या हैदराबाद मुक्ती संग्रामात सुद्धा त्यांचे योगदान होते विविध शासकीय कर्मचारी तथा राजकीय पदाधिकारी यांचे शिक्षण त्यांच्या हातात घडवले दिनांक १६ मार्च रोजी पहाटे ३-४५ वाजण्याच्या दरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले.सायंकाळी ५-०० क्रांतीनगर केज या ठिकाणी अंत्यविधी पार पडला.यावेळी स्वातंत्र्य सैनिक म्हणून केज तहसीलच्या वतीने मंडळ अधिकारी भालेकर यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली तसेच त्यांचा विद्यार्थी वर्ग अंत्यसंस्काराला उपस्थित होता.माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवेंद्र शेटे,निवृत्त पीएसआय शिंदे,निवृत्त सीआरपीएफचे लोंढे, स्वामी विवेकानंद विद्यालयाचे सचिव जी.बी.गदळे सर,शेषेराव कसबे,प्रशांत देशपांडे, सुनील देशपांडे,भारतीय जनता मजदूर संघाचे महाराष्ट्र सचिव धनंजय कुलकर्णी यांच्यासह नातेवाईक,आप्तस्वकीय विद्यार्थी जनसमुदाय उपस्थित होता.त्यांच्या पश्चात एक मुलगा,तीन मुली,नातवंड आदी परिवार आहे.

# डॉ.अशोक थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त होळ येथे आरोग्य तपासणी शिबीरास मोठा प्रतिसाद, ४०० ते ४५० रुग्णांची तपासणी



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथे डॉ.अशोकराव थोरात यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात दंत तपासणी व नेत्रतपासणी झाली.या शिबिरात ४०० ते ४५० नागरिकांची तपासणी करण्यात आली.तपासणी दरम्यान ६० रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून आला असून त्यांची ईसीजी तसेच आवश्यक ती रक्त तपासणी करण्यात आली.या सर्व रुग्णांच्या दोन टप्प्यांमध्ये केज येथील उपजिल्हा रुग्णालयात मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.या आरोग्य शिबिरासाठी डॉ.स्नेहल सागर नेत्ररोग तज्ञ,डॉ. नितीन चव्हाण नेत्ररोग तज्ञ,डॉ.प्रशांत शिंदे दंतरोग तज्ञ,इरफान पठाण ई सी जी टेक्निशियन,वैभव आडसकर एमपीडब्ल्यु किरण पोटभरे,सिद्धवी सोनटक्के वैष्णवी,शितल ठोंबरे,लता शिंदे,रोहिणी शिंदे आदी जणांनी सहकार्य केले.शिबिरा साठी गावाचे सरपंच योगेश भैया शिंदे,उप सरपंच बाळासाहेब घुगे, नारायण आबा शिंदे, ग्रामपंचायत सदस्य तानाजी दादा,संदीपान घुगे,अशोक घुगे,ड. राजेभाऊ शिंदे,संग्राम भैय्या शिंदे,प्रसिद्ध वक्ते दत्ता घुगे,गावातील ज्येष्ठ मंडळी व ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी व लालासाहेब शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. अशा आरोग्यशिबिरांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळतअसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# शांताबाई देविदास जाधव यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील लहुरी येथील श्रीमती शांताबाई देविदास जाधव वय ८५ यांचे रविवारी दि.१५ मार्च रोजी दुपारी २.३० वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने लहुरी गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सायंकाळी ७ वाजता गावातील सार्वजनिक स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे.त्या दैनिक झुंजारनेताचे ज्येष्ठ पत्रकार श्रावणकुमार जाधव



यांच्या मातोश्री होत.त्यांच्या निधनाबद्दल नातेवाईक,मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077